## वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नाव | पदनाम | विषय/विभाग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा.रमेशचंद्र खांडगे | प्राचार्य व विभाग | इंग्रजी | एम.ए. बी.एड. |
| २ | प्रा.रामकृष्ण देशमुख | प्रमुख | वाणिज्य | एम.कॉम. |
| ३ | प्रा.डॉ.विजय बाणकर | विभाग प्रमुख | तत्वज्ञान | एम.ए., पीएच.डी. |
| ४ | प्रा.शिवनाथ दिघे | विभाग प्रमुख | संचालक | बी.ए.एम.पी.ई. |
| ५ | प्रा.बबन महाले | शारीरिक शि. | मराठी | एम.ए., |
| ६ | प्रा.भानुदास शिंदे | विभाग प्रमुख | अर्थशास्त्र | बी.ए.एम.पी.ई. |
| ७ | प्रा.डॉ.सौ.अकीला शेख | व्याख्याता | हिंदी | एम.ए.एम.फिल.,पीएच.डी. |
| ८ | प्रा.अभिमन्यू केदार | विभाग प्रमुख | राज्यशास्त्र | एम.ए.बी.एड.,एम.फिल. |
| ९ | प्रा.संजय पगारे | विभाग प्रमुख | इंग्रजी | एम.ए.,पी.जी.डी.टी.ई. |
| १० | प्रा.संजय ताकटे | व्याख्याता | रसायनशास्त्र | एम.एस्सी. |
| ११ | प्रा.बाळासाहेब मेहेत्रे | विभाग प्रमुख | गणित | एम.एस्सी. |
| १२ | प्रा.केशव नाईकवाडी | विभाग प्रमुख | प्राणीशास्त्र | एम.एस्सी.डी.एच.ई. |
| १३ | प्रा.डॉ.बाबासाहेब देशमुख | विभाग प्रमुख | वनस्पतीशास्त्र | एम.एस्सी.,एम.फिल.,पीएच.डी. |
| १४ | प्रा.अशोक भाटे | विभाग प्रमुख | पदार्थविज्ञान | एम.एस्सी.डी.एच.ई.एम.एड. |
| १५ | प्रा.सुरेश मालुंजकर | विभाग प्रमुख | रसायनशास्त्र | एम.एस्सी. |
| १६ | प्रा.भाऊसाहेब भांगरे | व्याख्याता | वनस्पतीशास्त्र | एम.एस्सी. |
| १७ | प्रा.डॉ.अविनाश झांबरे | व्याख्याता | पदार्थविज्ञान | एम.एस्सी. पीएच.डी. |
| १८ | प्रा.महेंद्र बाणाईत | व्याख्याता | रसायनशास्त्र | एम.एस्सी. |
| १९ | प्रा. अशोक दातीर | व्याख्याता | पदार्थविज्ञान | एम.एस्सी. |
| २० | प्रा.साहेबराव गायकवाड | व्याख्याता | हिंदी | एम.ए. |
| २१ | प्रा.संपतराव सोनवणे | व्याख्याता | रसायनशास्त्र | एम.एस्सी. (सेट) |
| २२ | प्रा.डॉ.शिवाजीराव खेमनर | व्याख्याता | भूगोल | एम.ए.बी.एड., पीएच.डी. |
| २३ | प्रा.ॲड.सौ.मंगला हांडे | व्याख्याता | वाणिज्य | बी.ए., एल.एल.बी. |
| २४ | प्रा.बाळासाहेब देशमुख | व्याख्याता | इंग्रजी | एम.ए. |
| २५ | प्रा.डॉ.विजय शेडगे | व्याख्याता | तत्वज्ञान | एम.ए.,एम.फिल., पीएच.डी. |
| २६ | प्रा.यासिन सय्यद | व्याख्याता | राज्यशास्त्र | एम.ए. |
| २७ | प्रा.सोपानराव साळवे | व्याख्याता | इंग्रजी | एम.ए. |
| २८ | प्रा.किरण जाधव | विभाग प्रमुख | इतिहास | एम.ए. (सेट ॲण्ड नेट) |
| २९ | प्रा.डॉ.विजय भगत | व्याख्याता | भूगोल | एम.ए. पीएच.डी. |
| ३० | प्रा.सचिन पाळंदे | व्याख्याता | वाणिज्य | एम.कॉम. (सेट) |
| ३१ | प्रा.राहुल वाघमारे | व्याख्याता | वनस्पतीशास्त्र | एम.एस्सी., एम.फिल. |
| ३२ | प्रा.सौ.रंजना कदम | व्याख्याता | मराठी | एम.ए. (नेट) |

## कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नाव | पदनाम | विषय/विभाग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.गोरक्ष शिरसाट | उपप्राचार्य | इतिहास | एम.ए.बी.एड. |
| २ | श्री.डॉ.भास्कर खांडगे | पर्यवेक्षक | मराठी | एम.एम.एड.एम.फिल.पीएच.डी. |
| ३ | श्री.अनिरुद्ध वांगडे | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम.ए.बी.एड.पीएच.डी. |
| ४ | श्री.आत्माराम काळे | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम.ए.बी.एड. |
| ५ | श्री.गंगाधर लांडगे | सहाय्यक शिक्षक | मानसशास्त्र | एम.ए.डी.एच.ई.एम.फिल. |
| ६ | श्री.गणपत हासे | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम.ए.डी.एच.ई. |
| ७ | श्री.दगडू वाकळे | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम.ए.डी.एच.ई. |
| ८ | श्री.सखाराम चासकर | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम.ए.बी.एड. |
| ९ | श्री.प्रकाश जगताप | सहाय्यक शिक्षक | राज्यशास्त्र | एम.ए.बी.एड. |
| १० | श्री.डॉ.सुनील शिंदे | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम.बी.एड.पीएच.डी. |
| ११ | श्री.अनंत फापाळे | सहाय्यक शिक्षक | राज्यशास्त्र | एम.ए.डी.एच.ई. |
| १२ | श्री.नंदलाल काळण | शारीरिक शिक्षण | शारीरिक शिक्षण | एम.कॉम.एम.पी.एड. |
| १३ | श्री.ओंकार राठी | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम.ए.बी.एड. |
| १४ | श्री.बाळासाहेब शेटे | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम.ए.बी.एड. |
| १५ | श्री.भिमाजी पळसकर | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम.एस्सी.बी.एड. |
| १६ | श्री.बाळासाहेब शेवाळे | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| १७ | श्री.देवीदास चौधरी | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम.ए.बी.एड. |
| १८ | श्री.अशोक कडलग | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| १९ | श्री.गणपत नवले | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम.ए.बी.एड. |
| २० | श्री.भिका जाधव | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम.ए.बी.एड. |
| २१ | श्री.बाळू पवार | सहाय्यक शिक्षक | इतिहास | एम.ए.बी.एड. |
| २२ | श्री.तानाजी जाधव | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम.ए.बी.एड. |
| २३ | श्री.चांगदेव डोंगरे | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| २४ | श्री.संभाजी गायकवाड | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| २५ | श्री.संजय लांडगे | सहाय्यक शिक्षक | गणित | एम.एस्सी.बी.एड. |
| २६ | श्री.विवेक वाकचौरे | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम.एस्सी.बी.एड. |
| २७ | श्री.गोरख लांडगे | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम.ए.बी.एड. |
| २८ | श्री.नरेश खाडगीर | सहाय्यक शिक्षक | मराठी व इतिहास | एम.ए.बी.एड. |
| २९ | श्री.शावरसिद्ध बिराजदार | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम.ए.बी.एड. |
| ३० | श्रीमती मनिषा घोलप | सहाय्यक शिक्षक | गणित | एम.एस्सी.बी.एड. |

## कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नाव | पदनाम | विषय/विभाग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| ३१ | श्री.बापूसाहेब आवारी | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम.कॉम.बी.एड. |
| ३२ | श्री.बाळासाहेब गोर्डे | सहाय्यक शिक्षक | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी.बी.एड. |
| ३३ | श्री.राजेंद्र कर्पे | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| ३४ | श्री.गुलाब देशमुख | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| ३५ | श्री.शिवराम शिंदे | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम.एस्सी.बी.एड.. |
| ३६ | श्री.सतीश काळे | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| ३७ | श्री.महेश उगले | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम.एस्सी.बी.एड. |
| ३८ | श्रीमती नंदा डफळ | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम.ए.बी.एड. |
| ३९ | श्रीमती रुपाली रासने | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम.ए.बी.एड. |
| ४० | श्री.गंगाराम साबळे | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम.ए.बी.एड. |
| ४१ | श्री.योगेश उगले | क्रीडा शिक्षक | क्रीडा शिक्षक | एम.पी.एड. |
| ४२ | श्री.राजेंद्र चव्हाण | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम.ए.बी.एड. |
| ४३ | श्री.अनिल धिवर | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम.कॉम.बी.एड. |
| ४४ | श्री.आनंदा चौधरी | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम.कॉम.बी.एड. |
| ४५ | श्री.सोपान कोरडे | सहाय्यक शिक्षक | | |
| ४६ | श्री.ऋषीकेश कानवडे | सहाय्यक शिक्षक | | |

## सेवानिवृत्त कर्मचारी

| अ.नं. | व्यक्तीचे नांव | सेवापूर्ती दिनांक |
|---|---|---|
| १) | मा.प्रा.नंदकुमार रासने | ३१.५.२००९ |
| २) | मा.प्रा.आनंदा पाटील | ३१.७.२००९ |
| ३) | मा.डॉ.प्रा.मोहनकुमार बारगजे | ३१.५.२००९ |
| ४) | मा.प्रा.सौ.रजनी बारगजे | ३१.६.२००९ |
| ५) | मा.प्रा.श्रीशैल कुडगनुरे | ३१.५.२००९ |
| ६) | मा.श्री.पंढरी नवले | ३१.५.२००९ |

## विना अनुदानित कर्मचारी वृंद

| अ.नं. | नाव | पदनाम | विषय/विभाग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा.काशिनाथ गुंजाळ | विभाग प्रमुख | संगणक शास्त्र | एम.सी.एम. |
| २ | श्री.आश्पाक पठाण | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | एम.सी.एम. |
| ३ | श्री.दिनेश शेळके | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ४ | श्रीमती सुवर्णा गोरे | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ५ | श्री.जितेंद्र नेहे | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ६ | श्री.शिरीष डावखर | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ७ | श्रीमती अनुजा आरोटे | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ८ | श्रीमती सोनिया वाकचौरे | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ९ | श्रीमती नीता पवार | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| १० | श्री.प्रकाश माळी | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| ११ | श्रीमती स्वाती आस्वले | व्याख्याता | व्यवस्थापन शास्त्र | |
| १२ | श्री.दिपक गाडेकर | व्याख्याता | भूगोल–पदव्युत्तर विभाग | |
| १३ | श्री.किशोर सोनवणे | व्याख्याता | भूगोल–पदव्युत्तर विभाग | |
| १४ | श्रीमती श्वेताराणी नेलोरे | व्याख्याता | रसायनशास्त्र–पदव्युत्तर विभाग | |
| १५ | श्री. सामिन शेख | व्याख्याता | रसायनशास्त्र–पदव्युत्तर विभाग | |
| १६ | श्रीमती वृशाली देशमुख | व्याख्याता | राज्यशास्त्र–पदव्युत्तर विभाग | |
| १७ | श्रीमती कल्पना शिंदे | व्याख्याता | हिंदी–पदव्युत्तर विभाग | |
| १८ | श्री.माधव कुलकर्णी | सहाय्यक | | |
| १९ | श्री.किरण नेहे | सुरक्षा रक्षक | | |
| २० | श्री.सुरेश वाकचौरे | सुरक्षा रक्षक | | |
| २१ | श्री.अरुण शेटे | सुरक्षा रक्षक | | |
| २२ | श्री.जयराम जेडगुले | सुरक्षा रक्षक | | |
| २३ | श्री.गणेश वाळुंज | सुरक्षा रक्षक | | |
| २४ | श्री.अमोल वाकचौरे | सुरक्षा रक्षक | | |
| २५ | श्री.पंकज गायकर | सहाय्यक (य.च.मु.वि.) | | |

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| अ.नं. | नाव | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | श्री.चंद्रभान ढवळे | अधीक्षक | एम.कॉम. |
| २ | श्री.मधुकर मंडलिक | कनिष्ठ लिपीक | एम.ए. |
| ३ | श्री.मारुती बोडके | कनिष्ठ लिपीक | बी.ए.एल.टी.सी. |
| ४ | श्री.सिताराम बगाड | ग्रंथालय लिपीक | बी. कॉम. |
| ५ | श्री.लक्ष्मीकांत आगलावे | लघुलेखक | एम.ए.डी.जे. |
| ६ | श्री.काशिनाथ साबळे | प्रयोगशाळा सहाय्यक | बी.एस्सी. |
| ७ | श्री.सादिक सय्यद | कनिष्ठ लिपीक | एम.ए. |
| ८ | श्री.दीपक जाधव | प्रयोगशाळा सहाय्यक | बी.एस्सी. |
| ९ | श्री.भाऊसाहेब भालेराव | ग्रंथालय लिपीक | बी.ए.बी.लिब. |
| १० | श्री.प्रविण घुले | सहाय्यक ग्रंथपाल | एम.ए.,एम.लिब; एम.फिल. |
| ११ | श्री.सचिन चासकर | कनिष्ठ लिपीक | बी.ए. |
| १२ | श्री.दत्ताराम रुपवते | ग्रंथालय परिचर | नववी |
| १३ | श्री.बाळासाहेब अस्वले | ग्रंथालय परिचर | दहावी (नापास) |
| १४ | श्री.साहेबराव पडवळ | ग्रंथालय परिचर | एम.ए.बी.लिब. |
| १५ | श्री.संजय हुजबंद | ग्रंथालय परिचर | आठवी |
| १६ | श्री.नारायण छल्लारे | प्रयोगशाळा परिचर | दहावी (नापास) |
| १७ | श्री.जयराम पथवे | प्रयोगशाळा परिचर | दहावी (नापास) |
| १८ | श्री.अशोक वामन | प्रयोगशाळा परिचर | एम.ए. |
| १९ | श्री.तानाजी भांगरे | प्रयोगशाळा परिचर | दहावी (नापास) |
| २० | श्री.दादाभाऊ आरोटे | ग्रंथालय परिचर | बी.ए.बी.कॉम.एल.टी.सी. |
| २१ | श्री.कैलास भालेराव | प्रयोगशाळा परिचर | बी.ए. |
| २२ | श्री.सुदेश काठाळे | शिपाई | आठवी |
| २३ | श्री.मच्छिंद्र नाईकवाडी | प्रयोगशाळा परिचर | बारावी |
| २४ | श्री.शरद कडलग | प्रयोगशाळा परिचर | बारावी |
| २५ | श्री.बनेश सावंत | प्रयोगशाळा परिचर | दहावी (नापास) |
| २६ | श्री.हेमंत सोनवणे | शिपाई | अकरावी |
| २७ | श्री.रविंद्र इपकल | शिपाई | बी.ए. |
| २८ | श्री.रोहिदास चव्हाण | शिपाई | एम.ए. |
| २९ | श्रीमती प्रभावती भुजबळ | शिपाई | बारावी (नापास) |
| ३० | श्री.सखाराम पथवे | शिपाई | दहावी (नापास) |
| ३१ | श्री.किशोर धुमाळ | शिपाई | बी.ए. |
| ३२ | श्री.संजय फटांगरे | ग्रंथालय परिचर | एम.ए. |
| ३३ | श्री.लहानु जेडगुले | शिपाई | बारावी (नापास) |



# समीक्षा

## 'अगस्त्य' (२००८-२००९)
## बाबतच्या काही प्रातिनिधीक प्रतिक्रिया



(१९ जून २००९)

**मा. श्री. अनंतराव देशपांडे,**

माजी प्राचार्य, मॉडर्न हायस्कूल व ज्युनियर कॉलेज,
मु.पो.ता.अकोले, जि.अ'नगर. - ४२२६०१.

२००८-२००९ या वर्षाच्या 'अगस्त्य' चे मुखपृष्ठ पाहिले अन् मंत्रमुग्ध झालो.

छायांकन अत्युत्कृष्ट पण त्याहून विशेष मुखपृष्ठाची कल्पकता.

बुलेट रक्तलांछित पार्श्वभूमि, २६/११ चे स्मृतिस्तंभ संकल्पना अन् 'जरा याद करो कुर्बानी'ची अमरत्व पावलेली शब्दधुन.... सारे पाहून दोन परस्पर विरोधी भाव एकाच वेळी जागृत झाले. सुंदर मुखपृष्ठामुळे निर्माण झालेली प्रसन्नता अन् २६/११ ची प्रलयंकारिता. एकाच वेळी अतीव सौख्य अन् असीम दु:ख यांचा विलक्षण प्रत्यय देणारे मुखपृष्ठ.... कल्पिताहून अद्‌भुत आहे. मी या मुखपृष्ठाची फोटोफ्रेम करून घेणार आहे.

'एक स्नेहसंमेलन-शहिदांना समर्पण' संदर्भातील मान्यवरांची प्रतिक्रिया, मा. प्राचार्यांचे मनोगत- हे शेवटचे शहीद स्मारक ठरावे, या वक्तव्यातील आशावाद, मा. मधुकरराव तळपाडे यांचा 'पाकिस्तान भविष्यात नामशेष होईल ' हे विधान वाचून 'तथास्तू' असे मन्मन उद्‌गारले.

कधी नव्हे ते अन् कोठेही न आढळलेले एक आगळे वेगळे असे या नियतकालिकातील वैशिष्ठ्य म्हणजे प्रभारी ग्रंथपाल श्री. मारुती बोडके यांचे 'समर्पक मलपृष्ठे' हे संकलन. दुधावरची साय असते तसे हे मलपृष्ठ असते. कुठलेही पुस्तक हाती आले की मी मुखपृष्ठानंतर लगेच मलपृष्ठ पहातो (म्हणजे वाचतो). त्या ग्रंथातील सर्व संकल्पना संक्षेपी स्वरूपात त्या मलपृष्ठात मुद्रित केलेली असते. हे संकलन ही एक अद्‌भुत कल्पना आहे. मी एक बऱ्यापैकी वाचक आहे. परंतु असे संकलन आयोजन आजपर्यंतच्या माझ्या वाचनात आले नाही. श्री. मारुती बोडके यांचे 'स्पेशल' अभिनंदन ! .....

प्रा. डॉ. भास्करराव खांडगे यांचा 'विस्मृतीतील तमासगीर - दशरथ देवठाणकर' हा लेख या कलावंताचे पुनर्संजीवन आहे. (बुध्दवासी दादासाहेब रूपवते या कलावंताबद्दल समरसून बोलायचे इतकेच.) कै. देवठाणकराबद्दल संशोधनात्मक प्रथमच ज्ञान झाले.

प्रा.डॉ. विजय बाणकर यांचे अकरा ओळीचे संपादकियात जणू अकरा हजार ओळी अव्यक्त स्वरूपात आहेत. .....

मराठी, हिंदी गद्यपद्यात्मक वैचारिक व भावस्पर्शी (लेख, कविता) .. विद्यार्थ्यांच्या मानसिकता प्रकर्षाने जाणिवेत आणीत आहे.

ज्यांनी या अंकातील साहित्य सृजन केले त्या सर्वांचे .... तसेच अगस्त्यचे संपादक मंडळ, छायाचित्रकार, मुद्रक या सर्वांचेही

**उत्कट, अनंत शुभाशीर्वादांसह हार्दिक अभिनंदन अन् धन्यवादही !**

(१५ जून २००९)

**प्राचार्य डी. जी. / दिपा महानवर,**
लोणंद,
ता. खंडाळा,
जि.सातारा - ४१५५२१

'अगस्त्य' २००८-०९ मिळाला. पाहिला, वाचला, आवडला !

विशेषत: राष्ट्रीय अस्मिता जोपासणारे २६/११ हे कलात्मक मुखपृष्ठ भावले.

मलपृष्ठावरील सॉक्रेटिस - अवतरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. विविध ३६ ग्रंथांच्या मलपृष्ठावरील ब्लर्बज् संकलित करुन कॉलेज नियतकालिकात छापण्याचा मारुती बोडकेंचा उपक्रम स्तुत्य आहे.

कॉलेज नियतकालिकात प्राध्यापकांचेही अभ्यासपूर्ण लेख छापावेत असे माझे मत. त्या दृष्टीने प्रा.डॉ.भास्कर खांडगेंचा 'तमासगीर : दशरथ देवठाणकर' हा लेख अगस्त्य मध्ये समाविष्ट केलात; मनस्वी अभिनंदन ! तमाशा म्हणजे खेडुतांची लाडकी करमणूक. अकोले - संगमनेर म्हणजे अहमदनगर जिल्ह्याची तमाशा - पंढरी ! त्या अनुषंगाने डॉ.भास्करचा लेख औचित्यपूर्ण आहे.

संपादक प्रा.डॉ.विजय बाणकर व संपादक मंडळाचे

**हार्दिक अभिनंदन !**

(१९ जून २००९)

**प्राचार्य डॉ.पंडितराव पवार,**

**समन्वयक, पुणे विद्यापीठ,**
**नाशिक उपकेंद्र, नाशिक**

आपण आपल्या महाविद्यालयाची उत्कृष्ट नियतकालिकांची परंपरा याही वर्षी ......
अंकाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे २६/ ११ या घटनेचे प्रतीक म्हणुन मुखपृष्ठावरील हुतात्म्यांची कायम आठवण आणि प्रेरणा देणारा हुतात्मा स्तंभ होय. एकूणच शांततामय भारताचे हिरवेगार रंगाचे प्रतीक आणि ते नंदनवण उद्ध्वस्त करणाऱ्या, निरपराधांचे खून करणाऱ्या बंदुकीच्या गोळ्या हे सर्वच चित्र कोणाही भारतीयांच्या भावना हेलावून सोडणारे आहे.

आजच्या चंगळवादी जमान्यात आपल्या महाविद्यालयाचे 'शहिदांना समर्पित स्नेहसंमेलन' आणि हुतातमा स्मारक तरुणाईला अखंड प्रेरणा देणारे आहे.

**''सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते ।**
**उठतील त्या ज्वालातून भावी क्रांतीचे नेते ।''**

हा कुसुमाग्रजांचा संदेश या हुतात्मा स्तंभातून मिळत राहील, आपली व आपल्या सहकाऱ्यांची कल्पकता आणि योजकता सर्वांनाच अभिमानाचा आणि आदर्शाचा बोध देणारी आहे.

प्राचार्यांच्या मनोगतातून व्यक्त होणारी तळमळ आणि विद्यार्थ्यांना सजग केल्याच मंत्र म्हणजे दहशतवादाविरुद्ध दंड ठोकुन उभे राहण्याची प्रतिज्ञाच आहे. निमोलरच्या वचनातील शेवटचे वाक्य म्हणजे फारच मोठी सूचना आहे. कारण सर्वच आघाड्यांवर शांत राहिले तर सर्वांचेच अस्तित्व एक दिवस धोक्यात येणार आहे. ही प्रेषितवाणी डोळ्यात अंजन घालणारी आहे.

संपादकाने आपल्या कामातून त्यांचे कर्तृत्व सिद्ध केलेले असल्याने त्यास अधिक संपादकीय लिहावे लागले नाही.

नियतकालिकातील अंतरंगात अध्यात्म, ज्ञान, विज्ञान आणि विद्यार्थी विकासाचे अनेक पैलू चमकत आहेत. त्यामुळे अगस्त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि वर्तमानाचे बाळगलेले भान पानोपानी पहावयास मिळते. अंकातील मजकुराची मांडणी आणि छायाचित्रे अंकाला श्रीमंत करणारी आहे.
या यशात आपले, आपले विद्यार्थी व संपादक मंडळ या सर्वांचाच वाटा आहे. सर्वांचे

**मनपुर्वक अभिनंदन !**

**कै. मधुकरराव चौधरी**



ज्येष्ठ गांधीवादी समाजसुधारक,
राजीव गांधी नॅशनल अवार्ड विजेते व
महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष

**कै. विंदा करंदीकर**



ज्ञानपीठ पुरस्कार (२००३) विजेते

# श्रद्धांजली

**कै. गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी**



अ. ता. ए. सोसायटीचे संस्थापक चिटणीस

**कै. भाऊसाहेब संतुजी थोरात**



सहकारमहर्षी

महाराष्ट्र राज्य विधानसभेचे माजी सभापती

कै.मधुकरराव चौधरी,

ज्ञानपीठ पुरस्कार (२००३) विजेते

कै.विंदा करंदीकर,

सहकारमहर्षी

कै.भाऊसाहेब थोरात,

अ.ता.ए.सोसायटीचे प्रथम चिटणीस

कै.बा.ह.नाईकवाडी,

**यांशिवाय,**

शैक्षणिक वर्ष

२००९-२०१० मध्ये

जे जागतिक कीर्तीचे साहित्यिक,

शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, विचारवंत,

राजकीय व सामाजिक कार्यकर्ते,

शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, कलावंत,

संस्थेवर प्रेम करणारे स्नेही,

हितचिंतक विद्यार्थी कालवश झाले,

तसेच वर्षभरात सीमेवर

भारतभर झालेल्या

अतिरेकी व नक्षलवादी हल्ल्यात जे शहीद झाले

त्यांच्या आत्म्यास आमचे विनम्र अभिवादन व

भावपूर्ण श्रध्दांजली...!

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक चिटणीस गुरुवर्य कै.बा.ह.नाईकवाडी यांना वाहिलेली ही भावपूर्ण श्रद्धांजली

# जगावेगळा शिक्षणमहर्षी

– प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

३० जानेवारी १९४८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सर्व जगभरातून ज्या विविध प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्या त्यातील सर्वात लक्षवेधी प्रतिक्रिया ही प्रख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांची होती. ते म्हणाले, 'आणखी काही पिढ्यानंतर जगभरातील लोकांना महात्मा गांधींसारखा महामानव या पृथ्वीतलावर जन्माला आला होता, या गोष्टीवर विश्वास बसणार नाही. उलट ते एक दंतकथा मानतील. गुरुवर्य नाईकवाडी बाबांच्या निधनानंतर पुढील पिढ्यांमध्ये त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कामांचा आढावा घेतला व त्यांनी केलेल्या त्यागाच्या गोष्टी समाजाला सांगितल्या तर त्याच्यावरही लोकांचा विश्वास बसणार नाही व शिक्षणक्षेत्रात असा माणूस असू शकतो ही सुद्धा लोकांना एक दंतकथाच वाटेल.

बाबांच्या जीवनाचा विचार करताना ते ज्या परिस्थितीत जन्माला आले, त्या सामाजिक व शैक्षणिक आणि कौटुंबिक वास्तवाचाही विचार करणे अगत्याचे आहे. पारतंत्र्याचा काळ, वडिलांची पोलिस खात्यातील नोकरी, त्यामुळे गावोगाव भ्रमंती, मुलांचे लाड करणे तर सोडच परंतु मुलाचा प्रत्येक अवयव हा पालकांनी आणि गुरुजींनी छडीने फोडण्याकरताच निर्माण झालेला आहे असे मानण्याची सार्वत्रित वृत्ती व त्यातच घरातले अठरा विश्व दारिद्र्य. कै.हरिभाऊ नाईकवाडी यांचे कुटुंब या वास्तवाला अपवाद असण्याचे काहीच कारण नव्हते. त्यामुळे वडिलांच्या करड्या शिस्तीखाली व मातोश्री कै.सुंदराबाई यांच्या प्रेमळ पण कठोर अशा संस्कारात बाबांचे बालपण गेले. सर्वात थोरले असल्यामुळे साहजिकच जाणतेपणा फार लवकर आला व पुढे त्यांनी कौटुंबिक व सामाजिक जीवनात सदैव मोठ्या भावाची म्हणजेच 'दादा'चीच भूमिका बजावली. घरचे व बाहेरचे सगळे त्यांना 'दादा' किंवा 'बाबूदादा' हाक मारीत. यथावकाश बाबा मुंबईला स्थिर झाले. वडिलांच्या निधनानंतर सर्व कुटुंबाची जबाबदारी एका छोट्या खोलीत राहून पार पाडत असताना ते त्या काळात बी.ए., बी.टी. व एम.एड. झाले. आज या पदव्या अत्यंत स्वस्त व सवंग झाल्या आहेत. त्यामुळे तरुणपिढीला त्याचे महत्व उमजणार नाही. परंतु चातुर्वण्यांची व्यवस्था आणि त्या व्यवस्थेतील कंगोरे ज्यांना ज्ञात आहेत त्यांनाच त्याचे महत्व जाणवेल. या शैक्षणिक प्रगतीला आणखी एक बाजू ती म्हणजे तत्कालिन राजकीय वादळाची.फ्रेंच राज्यक्रांती ज्या वेळेला झाली,त्या वेळेस प्रख्यात आग्लकवी विल्यम वर्डस् वर्थ असे म्हणाला होता,"जे त्या सुवर्णमयी पहाटकाळी जन्माला आले, ते सुदैवी पण त्या काळी जे तरूण होते ते तर भाग्यवान"त्या अर्थाने बाबा भाग्यवानच होते.त्याच काळात नगर जिल्हयामध्ये स्वातंत्र्य चळवळीला उधान आले होते.महात्मा गांधीच्या नेतृत्वाने सगळा देश पेटून उठला होता आणि गांधीच्या एका हाकेसरशी गावोगावचे तरूण स्त्री-पुरूष ब्रिटीश सत्तेला आव्हान देत होते.बाबासारखा तरूण या काळात स्वस्थ बसणे शक्य नव्हते.त्यांनी ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी अण्णासाहेब शिंदे,भाऊसाहेब थोरात,रावसाहेब शिंदे,पी.बी.कडू पाटील,धर्मा पोखरकर, सटाण्याचे पाटील,भास्करराव दुर्वे, इत्यादींबरोबर व अकोले गांवातील जेठलाल शहा,धोंडू आबा गुजर,खांबेकर, निवृत्ती महाले इ. सहकाऱ्यांना बरोबर घेवून पूल उडवणे,तारा तोडणे, पोस्टाच्या पेट्या जाळणे व अकोले येथील ग्रामपंचायत जाळण्याचा प्रयत्न इत्यादी आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला.मातोश्री सुंदराबाई यांनी अनेक भूमिगतांना भाकरी पुरविण्याचे काम केले.

या सर्वाच्या प्रयत्नाने १९४७ साली देश स्वतंत्र झाला आणि जो तो आपल्या पोटापाण्याच्या उद्योगाला लागला. आतापर्यतची एकसंघ स्वातंत्र्य चळवळ ही पुढे निरनिराळ्या पक्षात व विचारसरणीत विभागली गेली.महात्मा गांधीच्या इच्छेचा अवमान करून काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी काँग्रेस विसर्जित केली नाही.त्यामुळे समाजवादी कम्युनिष्ट इत्यादी विचारसरणीचे काही कार्यकर्ते अलग झाले. बाबांनाही समाजावादाचे प्रथमपासूनच आकर्षण असल्यामुळे ते समाजवादी विचारसरणीकडे आकर्षित

होऊन, सक्रीय राजकारणापासून दूर झाले व राष्ट्र सेवा दलाचे काम करू लागले. मुंबई येथील नामवंत शिरोडकर हायस्कूलमध्ये बाबांनी शिक्षकाची नोकरी सुरू केली व तेथे आपल्या कर्तृत्वावर उपमुख्यापक व नाईट स्कूलचे मुख्याध्यापक पदावर पोहचले. धाकटया भांवाचे शिक्षण,वसुधैव कुटुंबकम् ही मनोवृत्ती असल्यामुळे त्यांच्याकडे आश्रयाला अनेक विद्यार्थी असत व त्यांना हमखास दोनवेळचे जेवण व निवारा बांबाकडे मिळे.या अशा असंख्य उदाहरणातले एक उदाहरण म्हणजे आजचे सहकार चळवळीचे एक जाणते भाष्यकार सन्मा.एम.ए. देशमुख या वयातही ते बाबांचे ऋण व्यक्त करताना भावूक होतात.

पण एवढ्या मर्यादित कुटुंबात समाधान मानतील तर ते बाबा कसले. मुंबईत ते सुखात होते.पण गांवाकडील भाषण वास्तव आठवले की ते अस्वस्थ होत आणि या भीषण वास्तवावरील नेमके औषध त्यांना माहित होते ते म्हणजे शिक्षण. महात्मा फुलेंचे ''विद्ये विना मती गेली' व ''सारे अनर्थ अविद्येने केले' हे जाणून त्या अविद्येवरच प्रहार करण्याचे त्यांनी ठरविले. त्या दृष्टिकोनातून त्यांनी कालकथित दादासाहेब रूपवते, कै.यशवंतराव सोनार इत्यादी सहकाऱ्यांना बरोबर घेवून मुंबई येथे सन १९५८ साली ''अगस्ती एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील व बहुजन समाजातील मुले शिक्षण घेत नाहीत. घेतलेच तर अर्धवट सोडतात.यावर मार्ग काढण्याकरता अकोले तालुक्यात बहुजनांचे म्हणवले जाणारे असे एक माध्यमिक विद्यालय सुरू करण्याचे त्यांनी ठरविले व त्यादिशेने शासन दरबारी प्रयत्न सुरू केले.

दिवसभर मुंबई येथे शाळेचे कामकाज उरकून, एस्.टी.बसने पहाटे अकोल्याला मुक्कामाला यायचे, ढेकणे यांच्या खानावळीमध्ये जेवण करायचे आणि दुसऱ्या दिवशी काम आटोपून परत मुंबईला जायचे. असे अनेक हेलपाटे बाबा व सोनार साहेब या जोडीने मारले.त्या काळी माध्यमिक विद्यालय सुरू करणे अत्यंत अवघड होते तथापि, सहा ते सात वर्षे अथक प्रयत्न केल्यानंतर कै.यशवंतराव भांगरे, भाऊसाहेब हांडे. अशा स्थानिक दिग्गजांना मदतील घेवून बाबांनी १९६६ साली सह्याद्रि विद्यालय ब्राम्हणवाडा व अगस्ति विद्यालय, अकोले ही दोन विद्यालये सुरू केली. मालकीच्या इमारती नाहीत. विद्यार्थी नाहीत, शिक्षकांना द्यायला पगार नाहीत. सगळीकडे हलाखीची परिस्थिती. त्यावर मात म्हणून पहिले सुमारे आठ ते नऊ वर्षे बाबांनी स्वतःचा पगार संस्थेत जमा केला व त्यावर या शाळांची उभारणी झाली.''मै अकेला चला था गलिबे मंजिल.लोग आते गये और कारवॉं बनता गया ' या उक्तीनुसार पुढे बाबांना असंख्य सहकारी मिळाले व आज अगस्ति शिक्षण संस्थेची जी भराभराट दिसते आहे, त्या रूपाने ''तयाचे वेलू गेला गगनावरी असे म्हणता येईल.

बाबांच्या या जीवनचरित्राचा आढावा घेत असतांना त्यांचे वेगळेपण कशात आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. आजकाल गावोगांव शिक्षणमहर्षि झालेले आहेत.अनुदान-विना अनुान शाळा, निरनिराळे अभ्यासक्रम सुरू करणे या सर्व तांत्रिक बाबी झाल्या आहेत आणि शिक्षणसंस्था सुरू करण्यामागील त्यागाची भूमिका जाऊन त्या जागी शिक्षण म्हणजे एक दूध देणारी गाय असून ती स्वार्थाकरिता वापरणे हे सूत्र सर्वमान्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर कुणाकडूनही एकही पैसा न घेता नोकरी देणे,जात -धर्म भेद न मानता एखाद्या गरजू विद्यार्थ्याला स्वखर्चाने वैदयकीय शाखेपर्यंत शिक्षण देणे व असंख्य शिक्षक व विद्यार्थी यांना मदतीचा हात देणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हे बाबांचे व्रत होते. काटकसर हा तर त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता, त्यांनी संस्थेचा प्रपंच अत्यंत काटेकोरपणे केला. त्यामुळेच राजकारणातील तत्कालिन असंतुष्टांनी काही काळ आणलेली प्रशासकीय कारकिर्द ज्यावेळेला सुरू झाली. त्यावेळेला वास्तव समोर हे आले की,पैसा संस्थेसाठी वापरला आहे आणि संस्थेसाठी वापरला आहे आणि संस्थेच्या उत्पन्नापेक्षा संस्थेतील फर्निचर,पुस्तके इत्यादी ॲसेटस इत्यादी जमा बाजू या जास्तच आहेत.अर्थात महाराष्ट्राला ही परंपरा नवीन नाही. त्या महाराष्ट्राने छत्रपती, संत तुकाराम. संत एकनाथ.डॉ बाबासाहेब आंबेडकर अशा महामानवांना त्यांच्य जीवंतपणी न्याय दिला नाही. त्या वृत्तीला अकोले तालुका तरी कसा अपवाद असणार!

वयपरत्वे बाबांचे निधन झाले. त्यांच्या स्मृती या त्यांच्या शाळांच्या संस्काराच्या शिस्तीचे व त्यागी जीवनाच्या आदर्शाने चिरकाल जिवंत राहतील. मोठी माणसे कधीच मरत नाहीत. मरणाचे भय हे सर्वसामान्यांना असते.शैक्षणिक क्षेत्रातील एक महामानव म्हणून भावी इतिहासाला बाबांच्या कार्याची नोंद घ्यावीच लागेल.

***

सहकार चळवळीचे अध्वर्यु थोर स्वातंत्र्यसेनानी

# कै.भाऊसाहेब थोरात

यांचे निधनानंतर

**प्रा.रमेशचंद्र खांडगे यांनी त्यांना वाहिलेली श्रद्धांजली....**

> त्यांच्या (भाऊसाहेबांच्या) आत्मचरित्राने आणि वेळोवेळी त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या लेखांमधून त्यांचे कार्यकर्तृत्व उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. आणि जोर्वेसारख्या एका सामान्य खेड्यात जन्माला येऊनही....

थोर स्वातंत्र्यसेनानी व सहकार महर्षी कै.भाऊसाहेब थोरात यांच्या निधनामुळे एक महान वटवृक्ष कोसळला आहे. या कोसळण्यात हा वटवृक्ष किती अभिमानास्पद जीवन जगला हेच त्यांच्या कार्याने अधोरेखित झाले आहे. मनुष्यप्राणी कितीही बलवान असला तरी नियती आणि काळ या दोन संकल्पनांपुढे सर्वांनाच नतमस्तक व्हावे लागते. मराठीतील थोर नाटककार कै.वसंत कानेटकर यांच्या शब्दात सांगायचे झाले तर 'एखादा वटवृक्ष कोसळल्यानंतर वटवृक्षाला लहान म्हणायचे नाही तर वादळ तेवढे प्रभावी होते' असेच म्हणावे लागते. कै. दादांच्या निधनाने एक वटवृक्ष काळाच्या अपरिहार्य अशा पडद्याआड गेला आहे. आणि त्या वटवृक्षाखालील असंख्य शिक्षणसंस्था, सहकारी संस्था, समूह आणि व्यक्ती यांना कायमचा पोरका करुन गेला आहे. त्यांच्या आत्मचरित्राने आणि वेळोवेळी त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या लेखांमधून त्यांचे कार्यकर्तृत्व उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. आणि जोर्वेसारख्या एका सामान्य खेड्यात जन्माला येऊनही एखादा झपाटलेला माणूस आभाळाएवढी उंची गाठू शकतो हेच अधोरेखित होते.

मानवी जीवन हे प्रकाश किरण परावर्तित करणाऱ्या कॅलिडोस्कोपसारखे असते. प्रत्येकाचा त्याच्याकडे बघण्याचा अनुभव आणि प्रचिती ही विभिन्न असते. आणि बऱ्याचदा त्यामध्ये मतभिन्नता असते. यापुढील लेखामध्ये कै.तीर्थरुप दादांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणे हा उद्देश नसून माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला त्यांच्या आयुष्यातले जे काही क्षण आले, त्याचा भावपूर्ण उल्लेख करणे. तीर्थरुप दादांना मी प्रथमतः पाहिले व लहानपणीच त्यावेळेला कै.साथी भास्करराव दुर्वेयांच्यापासह ते गावोगाव संगमनेर भाग सहकारी साखर कारखान्याच्या शेअर्सची विक्री जनतेत जाऊन करीत असत. संगमनेर, अकोले आणि सिन्नर या तीनही तालुक्यातील प्रमुख गावी ही मंडळी फिरत असत व आपल्या भागात साखर कारखान्याचे महत्व जनतेला पटवून देऊन त्याच ठिकाणी शेअर्सची पावती फाडत असत. नोकरीनिमित्त माझे वडील व आम्ही सर्व कुटुंबिय कोतूळ या गावी होतो. फारसे कळत जरी नसले तरी वडिलांनी एक शेअर्स घेतल्याचे आठवते. माझ्या आठवणीनुसार शेअर्सची किंमत रु.३३५-०० असावी. पुढे केवळ दादांच्या नेतृत्वामुळे आणि दूरदृष्टीमुळे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे काटेकोर शिस्तबद्ध आणि भ्रष्टाचारमुक्त व्यवस्थापनामुळे हा कारखाना आज नावारुपाला आलेला आहे. दुसरी आठवण अकोले येथील महाविद्यालय सुरु झाल्याची आहे. महाविद्यालयाचे एक संस्थापक विश्वस्त कै.कॉ.बुवासाहेब नवले हे तीर्थरुप दादांचे श्रद्धास्थान. अकोले तालुक्याने स्वातंत्र्य चळवळीत अनेक स्वातंत्र्य सैनिकांना भूमिगत चळवळीमध्ये केलेले सहाय्य दादांच्या कधीच विस्मरणात गेले नाही. पुढे ते राज्यपातळीवर नेतृत्व करु लागले तरी देखील आपल्या जुन्या सवंगड्यांना कधीही विसले नाहीत. असो तर बुवासाहेब नवलेंच्या निधनानंतर त्यांचे कायमस्वरुपी स्मारक अकोले महाविद्यालयात व्हावे

ही दादांची तळमळ. त्यांनीच पुढाकार घेऊन आज महाविद्यालयात दिमाखात उभे असलेले कै.बुवासाहेब नवले रंगमंचाचे काम सुरु करुन ५ मार्च १९८४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील यांच्या शुभहस्ते त्याचे उद्घाटनही करुन टाकले.

सन १९९२ साली अकोले येथे एक इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्याची कल्पना आमच्या डोक्यात आली. मी व मधुभाऊ नवले महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मार्गदर्शनाकरीता विविध शिक्षणमहर्षींना भेटलो. सर्वांनी तुम्ही या उद्योगात न पडलेले बरे असा सल्ला दिला. फक्त तीर्थरुप दादा आमच्या पाठीशी उभे राहिले. आमच्या कल्पनेचे कौतुक केले. एवढेच नव्हे तर स्वतः उद्घाटनाकरीता हजर राहिले. त्यावेळची एक कौटुंबिक आठवण सांगण्यासारखी आहे. कार्यक्रमापूर्वी सकाळचा नाश्ता करण्यासाठी ते माझ्या घरी येणार होते. साहजिकच मी विचारले, 'नाश्त्याकरीता काय करु ?' त्यांच्या नेहमीच्या स्वभावाने त्यांनी मला विचारले, 'तू प्राध्यापक, तुझी बायको शिकलेली, तिला थालीपीठ करता येते का ? त्यानुसार नाश्ता झाल्यानंतर दादांनी माझ्या सौभाग्यवतीचे मनमुराद कौतुक केले. बराच वेळ त्यांच्याशी गप्पा मारल्या आणि आम्हा सर्वांना आशिर्वाद देऊन कार्यक्रमास निघून गेले.

बुवासाहेब नवले हे एक ज्येष्ठ रंगकर्मी होते. परंतु दुसरा अनुभव कै.अण्णासाहेब देशमुख यांच्या बाबतीतला आहे. दादांचा अण्णासाहेबांवरही प्रचंड लोभ. अण्णासाहेबांनी जेव्हा ट्रॅक बदलून आपले 'गोधडी' हे आत्मकथन छापण्याचे ठरविले त्योवळेला आम्हा खांडगे बंधूंचाही त्याला हातभार लाभला. प्रकाशन करण्यासाठी आम्ही आर्थिक अडचणीत होतो. दादांना हे कळले आणि त्यांनी मला निरोप दिला. भेटण्यासाठी ये. निळवंडे धरणाच्या भूमीपूजनाच्या निमित्ताने आदरणीय श्री.शरद पवार साहेब निळवंडे येथे येणार होते. सूत्रसंचालनाचे काम माझ्याकडे होते. दादांनी मला गाठले. माझ्या हातावर ५००० रुपये ठेवले आणि सांगितले प्रकाशन समारंभ जोरात करा आणि अण्णासाहेबांचे तोंडभरुन कौतुक केले.

दादांच्या संस्थेच्या इंजिनिरींग कॉलेजमध्ये प्राध्यापकांचे काही प्रश्न होते. प्राध्यापक संघटनेची काही मंडळी एके दिवशी कॉलेजसमोर आंदोलन करण्याच्या हेतूने संगमनेरला आली आणि मांडव टाकून बसली. मी त्यावेळी पुणे विद्यापीठाच्या सिनेटचा सदस्य होतो. संघटनेचे सक्रीय कामकाज मी सोडले होते. परंतु बांधिलकी होतीच. दादांचा स्वभाव मला चांगलाच माहीत असल्यामुळे या आंदोलनाचे आता काय होणार? ही चिंता मला पडली. माझे मित्र कै.प्रा.दिलीप धर्म व मी एकत्र मिळून संघटनेचे नेते व दादा यांच्याशी एकाच वेळेला चर्चा सुरु केली. दादांची मते स्पष्ट होती आणि तशा अर्थाने दादा मुत्सद्दी नव्हते. त्यांनी मला आणि धर्म सरांना भरपूर सुनावले. परंतु दुसऱ्या बाजूने संघटनेचे नेतेही आपल्या आंदोलनावर ठाम होते. दोघांच्याही भूमिका प्रामाणिक आणि स्पष्ट होत्या. साहजिकच पुढे संघर्ष अटळ होता आणि त्याचे परिणाम दूरगामी होणार होते. ॲड.सोनवणे यांना भेटून मी सर्व कल्पना दिली. कसेबसे दादांना चर्चेकरीता व तडजोडीकरता तयार केले आणि एकदाचे ते आंदोलन आम्ही फार चिघळू दिले नाही याचे आजही मनाला फार मोठे समाधान आहे. परंतु त्या निमित्ताने दादांचा करारी आणि स्पष्टवक्तेपणाच्या स्वभावाचा प्रत्यय आला. पुढे ज्या ज्या वेळी मी त्यांना भेटत असे त्या त्या वेळेला ते गेल्या गेल्या 'पुक्टो' वरुन मला दोनचार वाक्य हमखास ऐकवीत.

अलिकडे मी पुन्हा एकदा पुणे विद्यापीठाच सदस्य झालो. मी व प्राचार्य कानवडे त्यांचे आशिर्वाद घेण्याकरता गेलो असता त्यांनी आमचा सत्कार केला, आशिर्वाद दिला. पण फक्त 'पगाराकरता भांडू नका' हे सांगयला मात्र विसरले नाहीत. काही काळ दादा व मा.ॲड. रावसाहेब शिंदे यांच्याबरोबर पुणे विद्यापीठात सिनेट सदस्य म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. सिनेटमधील कामकाज पाहिल्यानंतर त्यांनी जे विचार व्यक्त केले ते जाहीर सांगण्यसारखे नाहीत एवढेच याठिकाणी नमूद करतो. दादांनी कधी आपल्या भावना लपवल्या नाहीत. त्यांचे रागलोभ स्पष्ट होते. तोंडदेखलेपणा त्यांनी कधीच केला नाही. पण ज्यांना जवळचे मानले त्यांच्यावर आंधळे प्रेम केले. माझ्यासारखा सर्वसामान्य कार्यकर्ता जेव्हा जेव्हा त्यांच्याकडे आठवणीने बिनसाखरेचा चहा करण्यास सांगत. हीच परंपरा आज आमचे मित्र सन्माननीय डॉ.सुधीर

तांबे व सौ.दुर्गाताई चालवित आहेत. जवळ बसून सफरचंदाची फोड हातात देणार. लवकर खा म्हणणार. नाहीतर काळ पडेल असेही दटावणार. असे निर्मोही प्रेम त्यांनी कार्यकर्त्यावर केले. नामदार बाळासाहेब थोरातांची ज्येष्ठ कन्या शरयुच्या लग्नातला एक प्रसंग. हातात असलेल्या सर्व संस्थांचा हवा तसार दुरुपयोग हे पितापुत्र करु शकले असते परंतु तसे त्यांनी केले नाही. एवढेच नाही तर विवाह समारंभाच्या प्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांना दूध वाटप झाल्यावर त्या दूधाच्या बिलाचा चेक स्वहस्ते, स्वतःच्या उत्पन्नातून देताना मी त्यांना पाहिले आहे.

तालुक्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कै.पी.जी. भांगरे यांच्या स्मारकासाठी पहिला रु.२५००० चा चेक दादांनी कॉलेजकडे सुपूर्द केला होता. दुर्दैवाने त्यांचे स्मारक आम्ही करु शकलो नाही.

दादांच्या निधनाने आता ह्या सगळ्या आठवणी जागृत झाल्या. त्यांची परंपरा व कार्य चालवण्यास नामदार बाळासाहेब थोरात, आमदार सुधीर तांबे, सौ.दुर्गाताई तांबे इ. सर्व कुटुंबिय समर्थ आहेत याची आपणा सर्वांना खात्री आहे. त्यांच्या कार्यात त्यांना हातभार लावणे हीच खरी दादांना श्रद्धांजली ठरेल.

***

# स्थानिक व्यवस्थापन समिती

## वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री.जे.डी. आंबरे पाटील | अध्यक्ष |
| २) | मा.श्री.ॲड्.वसंतराव मनकर | सदस्य |
| ३) | मा.श्री.यशवंतराव आभाळे | सदस्य |
| ४) | मा.श्री.डॉ.डी.के.सहाणे | सदस्य |
| ५) | मा.श्री.ॲड्.के.बी. हांडे | सदस्य |
| ६) | मा.श्री.मीनानाथ पांडे | विस्तार प्रमुख |
| ७) | मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे | पदसिध्द सेक्रेटरी |
| ८) | मा.श्री.बी. एम्. महाले | शिक्षक प्रतिनिधी |
| ९) | मा.श्री.के.बी. नाईकवाडी | शिक्षक प्रतिनिधी |
| १०) | मा.श्री.बी.के. भांगरे | शिक्षक प्रतिनिधी |
| ११) | मा.श्री डी.बी.रुपवते | शिक्षकेतर प्रतिनिधी |

# स्थानिक व्यवस्थापन समिती

## कनिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री.अॅड्.वसंतराव मनकर | अध्यक्ष |
| २) | मा.श्री.यशवंतराव आभाळे | सदस्य |
| ३) | मा.श्री.डॉ.डी.के.सहाणे | सदस्य |
| ४) | मा.अशोकराव भांगरे | सदस्य |
| ५) | मा.श्री.हामीदभाई फारुकी | सदस्य |
| ६) | मा.श्री.मीनानाथ पांडे | विस्तार प्रमुख |
| ७) | मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे | पदसिध्द सेक्रेटरी |
| ८) | मा.श्री.जी.बी.शिरसाट | उपप्राचार्य |
| ९) | मा.डॉ.भास्करराव खांडगे | पर्यवेक्षक |
| १०) | मा.श्री.जी.एन्. लांडगे | शिक्षक प्रतिनिधी |
| ११) | मा.श्री.जी.जे. नवले | शिक्षक प्रतिनिधी |

# Internal Quality Assurance Cell (I.Q.A.C.)
# 2009 - 2010

1 **Chairperson**

Prof. Rameshchandra Khandge
*Principal*

2 **Senior Administrative Officers**

Shri. Chandrabhan Dhawale,
*Office Superintendent*

Shri. Laxmikant Aglawe,
*A Senior Member from Non-Teaching Staff*

3 **Teachers**

Prof. Ramkrishna Deshmukh,
*In-charge, Commerce Faculty*

Prof. Sanjay Takate,
*In-charge, Science Faculty*

Prof. Sanjay Pagare,
*Lecturer in English*

Dr. Babasaheb Deshmukh,
*Coordinator, Education & Research Upgradation Committee*

Prof. Keshav Naikwadi,
*Teacher-Representative, LMC*

Prof. Dr. Avinash Zambare,
*Students Welfare Officer*

Prof. Ashok Datir,
*Lecturer in Physics*

Dr. Vijay Bhagat,
*Lecturer in Geography*

# ----- COLLEGE AT A GLANCE -----

**Beginnings :** Akole Taluka Education Society, the parent-institution was established in 1972. Late Shri. Dadasaheb Rupwate ensured the support of all political and social workers for the noble cause of education.

**Feathers in the Cap :** A) NAAC Accredited Grade : ' B++' ( 84 % Marks).
B) Best Rural College Award of the University of Pune.

**Growth :** A) Student Population - At The Beginning : 94, Now : 4000 B) Staff - At The Beginning : 6, Now : 175.

**Infrastructure :** Well-furnished Administrative building, Science building, Arts Faculty building, Students' Hostel, Open Theatre, Library building, Laboratories, K.B. Dada Sabhagriha, Conference Hall, Guest House, Gymkhana office & spacious play-grounds including 400 meter running track, Ladies Hostel, Canteen, Security Cabin, Cycle-stand etc. (New Multi-storied Classroom Building in progress).

**Courses :** Under Graduate : B.A., B.Com., B.Sc., B.Sc.(ComputerScience), B.C.A., B.B.A.
Post Graduate : M.A.(Hindi), M.A.(Political Science), M.A. (Marathi), M.A.(English), M.Sc.(Org. Chemistry), M.A. / M.Sc. (Geography).

**Library :** More than 50 thousand books in stock. Bar-coding work in progress.

**Research Activities :** A) Research Papers - Total 36 : International with Impact factor : 2, International : 10, National Level with ISS No. Journals : 20, National Level : 15.
B) Guides : Three teachers recognized as Research Guides

**Co-curricular and Extracurricular Activities :** For the personality development of students.

**Laurels in Games and Sports :** Gold, Silver and Bronze medals at National level sports events.

**Glory in Uniform (N.C.C.) : Achievements -** 1) 70 Cadets in Indian Army
2) 4 Gold Medals in National Camps
3) Participation in Republic Day Parade in Delhi : 3 Students.

**N. S. S. :** The unit has been awarded Best Unit Award, by the University of Pune, twice.

**Serving the People :** The college implemented the Indo-German Watershed Development programme in Dhamangaon Awari.The amount of work done there on the
(Area 1800 hectares. Valueof the work done - Rs.1 Crore & 13 lacs.)

**Our Greenland :** Well-developed Botanic Garden containing medicinal, endangered, ornamental plants etc. Beautiful campus of 18 Acres full of lush green trees and bushes of various types.

**I.T. Laboratory :** 100 computers.

**Seminars and Conferences :** University level, State level and National level Seminars and Conferences organized from time to time.

**Regular Gatherings :** The tradition of Annual Social Gathering and Prize distribution ceremonies continues uninterrupted.

**Honours /Awards :** Two teachers and two Non-teaching employees honoured for their excellence in work.

**Open Space :** The college runs a centre of Y. C. Maharastra Open University, Nasik.

**Continuing at the Top :** 'Agastya', our college magazine, is a much awarded magazine. It continues to be appreciated by the University of Pune.

Prof. Sanjay Pagare
Member

Dr. Vijay Bankar
Co-ordinator


Internal Quality Assurance Cell

Arts, Commerce & Dadasaheb Rupwate Science College, Akole, Dist. : Ahmednagar - 422601.

# Awards of Excellence




1st Rank
District Level 2004-2005




2nd Rank
University Level 2005-2006




1st Rank
University Level 2006-2007




1st Rank
District Level 2008-2009

**Cover Pages of Our Awarded Magzines**